एप्रिल–मे २०११ – किंमत एक रुपया

एकमेकां सहाय करू ! अवघे धरू सुपंथ !!

# सेवा दीप

ज्ञान सेवा ऐक्य

रोहिदास समाज पंचायत संघाचे मुखपत्र



नियोजित
संत रोहिदास भवन

# श्रीमती साधना देवरूखकर यांची ‘संत रोहिदास भवनास’ रु. ४,५०,०००/- देणगी

संत रोहिदास भवनाच्या शोरींग पाईल कामाचा शुभारंभ रविवार दिनांक १० एप्रिल २०११ रोजी संघाचे अध्यक्ष **मा. श्री. भागुराम कदम** व मुंबईचे माजी महापौर **मा. श्री. महादेव देवळे** या द्वयींनी नारळ वाढवून केला. यावेळी समाजातील स्थानिक पंचायत, विभाग समितीचे पदाधिकारी व माजी विश्वस्त मोठया प्रमाणात उपस्थित होते.

प्रथम संघाचे अध्यक्ष **श्री. भागुराम कदम** व त्यांची पत्नी **सौ. शैलेजा कदम** या उभयतांच्या हस्ते श्रीराम मंदीरात गणेश पुजन करण्यात आले.

त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात मुंबईचे माजी महापौर श्री. महादेव देवळे यांनी शोरींग पाईलच्या कामास सुरूवात केल्याबदद्ल संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम व संघ विश्वस्तांचे अभिनंदन केले. व संत रोहिदास भवन उभे राहिपर्यंत सर्व कार्यकर्त्यांनी झटून काम करावे असे आवाहन केले.

अध्यक्ष श्री. भागुराम कदम म्हणाले की, संत रोहिदास भवनाच्या शोरींग पाईल कामाचा शुभारंभ आज आपण केलेला आहे. संपूर्ण समाज माझ्या पाठीशी खंबीर पणे उभा आहे. याची जाणीव मला आहे. आणि संत रोहिदास भवन उभे राहिपर्यंत त्यांनी सातत्याने मदत करावी. असे आवाहन केले.

या प्रसंगी समाजातील भगिनी **श्रीमती साधना सखाराम देवरूखकर** यांनी संत रोहिदास भवन निधी रु ४,५०,०००/–, **श्री. आत्माराम लक्ष्मण सावर्डेकर** रु. १,५१,०००/–, **श्री. प्रदीप का. सावर्डेकर** रु. १,५१,०००/–, **श्री. रवि पेवेकर** व सौ. **सुचेता रवि पेवेकर** रु. ५१,०००/–, संघाचे उपाध्यक्ष **श्री. विजय सावर्डेकर** रु. ५०,०००/–, **श्री. भागुराम कदम** व **सौ. शैलेजा कदम** रु. २५,०००/–, **श्री. रमेश कदम** रु. २५,०००/–, **श्री. भागुराम आंबोकर** रु ४०,०००/–, **श्री. गजानन जानवलकर** रु ४०,०००/–,



संत रोहिदास भवनाच्या शोरींग पाईल कामाच्या शुभारंभी श्रीमती साधना सखाराम देवरूखकर यांनी रु. ४,५०,०००/– ची देणगी जाहीर केली. त्याबद्दल त्यांना संघाचे अध्यक्ष श्री. भागुराम कदम यांच्या पत्नी सौ. शैलेजा कदम या श्रीमती साधना देवरूखकर यांना पुष्पगुच्छ देवून सत्कार करताना छायाचित्रात दिसत आहे. डावीकडून श्री. केशव पंदीरकर, श्री. प्रितम पेवेकर, संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम दिसत आहेत.

**श्री. मयुर देवळेकर** रु. १४,५५५/–, **श्री. सुर्यकांत आंबेकर** रु. २०,०००/–, **श्री. केशव पंदीरकर** रु १४,४४४/– **श्रीमती रूक्मणी विठ्ठल चव्हाण** रु २६,६६६/–, **श्री. मिलिंद चव्हाण** रु. २०,०००/– यांनी देणग्या जाहीर केल्या. तर सल्लागार **श्री. विनोद रामपूरकर** यांनी रु. २५,०००/– धनादेश व **श्री. सुनिल गोविंद धयालकर** यांनी रु. ४,०००/– ची रोख देणगी संघाध्यक्षांकडे सुपुर्द केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सरचिटणीस **श्री. रवि पेवेकर** यांनी केले तर आभार प्रदर्शन चिटणीस **श्री. पंढरी जानवलकर** यांनी केले.

## ‘‘हार्दिक अभिनंदन’’

### पॅकेजिंग टेक्नोलॉजी मध्ये ‘सुवर्ण पदक’



विभाग क्र. १४, हरीयाली व्हिलेज स्थानिक पंचायतीचे सभासद श्री. दिपक गोविंद शिरकर यांची कन्या **कु. स्नेहल शिरकर** हिने 'Graduate Diploma in Packaging Technology' मध्ये 76.82% गुण मिळवून **‘सुवर्ण पदक’** प्राप्त केले आहे. तीच्या पुढील यशासाठी रोहिदास समाज पंचायत संघाच्या वतीने **हार्दिक शुभेच्छा!!**

**सेवादीप**

वर्ष ३७ वे अंक ६ वा एप्रिल–मे २०११

संपादक
**श्री. रघुनाथ मा. घानकुटकर** (S.E.O.) (दलित मित्र)

मुद्रक व प्रकाशक
**श्री. भागुराम सोनू कदम** (अध्यक्ष)

व्यवस्थापक
**श्री. रवि विष्णू पेवेकर** (सरचिटणीस)

व्यवस्थापन–साहित्य समिती
**श्री. रामदास महादेव आंबोकर** (अध्यक्ष)
**श्री. राजेश गंगाराम कदम** (चिटणीस)

मुद्रण स्थळ : ड्रिम ग्राफिक्स, डोसा कंपाऊंड, के. के. मार्ग, मुंबई–४०० ०११

**कार्यालय व प्रकाशन स्थळ**
संत रोहिदास वसतिगृह, बी.डी.डी. चाळ क्र. २६ व २७ च्या मध्ये, मारुती मंदिर शेजारी, डिलाईल रोड, मुंबई–४०० ०१३,
**दूरध्वनी** : २३०२०३४०

रोहिदास समाज पंचायत संघाच्या मालकीचे पत्र मुद्रक व प्रकाशक संघाध्यक्ष श्री. भागुराम सोनू कदम यांनी रोहिदास समाज पंचायत संघासाठी प्रसिद्ध केले.

चर्मकार समाजाच्या सर्वांगिण उन्नतीकरिता महाराष्ट्र शासनाने ‘‘संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची’’ स्थापना केलेली आहे. सदर महामंडळाने चर्मकार समाजासाठी विविध योजना आखल्या आहेत. त्यांची माहिती क्रमशः सेवादीपमध्ये प्रसिद्ध करीत आहोत. गरजू समाज बंधू–भगिनींनी या योजनांचा लाभ घ्यावा.

– **श्री. भागुराम कदम** (अध्यक्ष)

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# लिडकॉम

माहिती पुस्तिका

भाग ३

## महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना

### अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

१. अर्जदाराचा शैक्षणिक दाखला
२. उत्पन्नाचा दाखला
३. जातीचा दाखला
४. नुकताच काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो
५. रेशनकार्डची झेरॉक्स प्रत
६. व्यवसायासाठी लागणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या किंमतीचे दरपत्रक
७. अर्जदारास ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेच्या उपलब्धतेचा पुरावा किंवा भाडयाचे करारपत्र
८. अर्जदारास व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिकेचा ‘ना हरकत’ परवाना अथवा दुकाने अधिनियमाखालील परवाना (बीज भांडवल कर्ज मागणीसाठी)
९. प्रकल्प अहवाल (बीज भांडवल कर्ज मागणीसाठी)
१०. दोन शासकीय/निमशाकीय, जामिनदार, जामिनदारांच्या कार्यालयाचे हमीपत्र, जामिनदारांचे प्रमिज्ञापत्र (बीज भांडवल कर्ज मागणीसाठी)

### ३) प्रशिक्षण योजना :

चर्मकार समाजाच्या लाभधारकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी विविध व्यावसायिक ट्रेडचे शासन मान्यताप्राप्त संस्थेमार्फत (3 ते 6 महिन्यापर्यंत) मोफत प्रशिक्षण देण्यात येते.

१. शिवणकला, २. ब्युटीपार्लर, ३. इलेक्ट्रीक वायरमन, ४. टर्नर/फिटर, ५. मशीनवर स्वेटर विणणे, ६. खेळणी बनविणे, ७. टी.व्ही./रेडिओ/टेपरेकॉर्डर मेकॅनिक, ८. संगणक प्रशिक्षण, ९. मोटार वाईन्डींग, १०. फेब्रीकेटर/वेल्डींग, ११. ऑटोमोबाईल रिपेअरींग (टु व्हीलर, थ्री व्हीलर, फोर व्हीलर), १२. वाहनचालक (मोटार ड्रायव्हिंग), १३. चर्मोद्योग पादत्राण उत्पादन, १४. चर्मोद्योग चर्मवस्तू उत्पादन

क्रमशः

## विभाग क्र. ८ (फितवाला रोड)

# संत रोहिदासांची शिकवण आचारणात आणावी

— श्री. भागुराम कदम




रोहिदास समाज पंचायत संघ, विभाग समिती क्र. ८ ने आयोजित केलेल्या 'संत रोहिदास जयंती व विद्यार्थी कौतुक सोहळा' कार्यक्रमात संघाचे अध्यक्ष श्री. भागुराम कदम मार्गदर्शन करताना छायाचित्रात, डाविकडून विभाग उपाध्यक्ष श्री. अनंत घानकुटकर, संघाचे चिटणीस श्री. पंढरी जानवलकर, व श्री. गणेश चव्हाण, शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. सुभाष समजिस्कर व विभाग चिटणीस श्री. विद्याधर शिर्के दिसत आहेत.

संत रोहिदासानी १४ व्या शतकात समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. व या कामात त्यांनी कशाची ही तमा न बाळगता स्वतःस झोकून दिले. त्यामुळेच त्यांनी त्यावेळच्या अनेक दिग्गजांना वादविवादां मध्ये हरवून दाखवून दिले की, जाती वरून कोणीही उच्च निच्च ठरू शकत नाही. ते त्यांच्या स्वकर्तुत्वांनेच उच्च ठरू शकतो. ही संत रोहिदासांची शिकवण आपण आचारणत आणावी. असे आवाहन संघाध्यक्ष **श्री. भागुराम कदम** यांनी केले. ते रोहिदास समाज पंचायत संघ, विभाग समिती क्र.८, ने आयोजित केलेल्या **'संत रोहिदास जयंती व विद्यार्थी कौतुक सोहळयाचे'** अध्यक्ष म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, संत रोहिदासांचे स्मरण समाजात सातत्याने व्हावे या करिता. 'संत रोहिदास भवन' लवकरात लवकर उभे रहावे यासाठी आपण सर्वांनी सर्वोतोपरी मदत करावी अशी विनंती केली.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संघ चिटणीस **श्री. पंढरी जानवलकर** यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. समाजाचे नेते व संघाचे अध्यक्ष **श्री. भागुराम कदम** हे आपल्या विभागातील आहेत. त्यांच्या पाठीशी विभागातील सर्व कार्यकर्त्यांने उभे राहून "संत रोहिदास भवन" लवकरात लवकर उभे करण्यास मदत करावी. प्रमुख अतिथी संघाचे चिटणीस **श्री. गणेश चव्हाण** यांनी विभाग करीत असलेल्या कार्याबाबत कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. परंतु हेच कार्यक्रम यापेक्षाही मोठया प्रमाणत साजरे करावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमात इयत्ता १ली ते १५वी पर्यंत उर्तीण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पाहुण्याच्या हस्ते पारितोषिके देवून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग चिटणीस **श्री. विद्याधर शिर्के** व आभार प्रदर्शन विभागाचे उपाध्यक्ष **श्री. अनंत घानकुटकर** यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभागाचे विश्वस्त व शिक्षण समितीचे अध्यक्ष **श्री. सुभाष समजिस्कर** यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कायक्रमाची सांगता झाली.

---




पारितोषिक स्विकारताना श्री. बळीराम सुसविरकर (मध्ये)

## बळीराम सुसविरकर यांना 'पॉवर लिफ्टींग' स्पर्धेत ६० किलो वजनी गटात 'सुवर्ण पदक'

सास्कृतिक व कला–क्रिडा समितीचे अध्यक्ष, विभाग समिती क्र. १२ चे विश्वस्त व नेहरूनगर (द.) स्थानिक पंचायतीचे चिटणीस **श्री. बळीराम महादेव सुसविरकर**, यांना ऑक्टोबर २०१० रोजी कामगार क्रिडा भवन, येथे झालेल्या **पॉवर लिप्टींग** स्पर्धेत (मुंबई जिल्हा) ६० किलो वजनी गटात प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक मिळले. तसेच नोव्हेंबर २०१० मध्ये सोशल सर्व्हिस लिग, परेल, मुंबई येथे झालेल्या (राज्यस्तरीय) ६० किलो वजनी गटामध्ये दुसऱ्या क्रमाकांचे रौप्य पदक मिळाले. तसेच डिसेंबर २०१० मध्ये तळेगांव येथे झालेल्या राज्यस्तरीय डेड लिफ्ट स्पर्धेत ६० किलो वजनी गटात प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक मिळाले. रोहिदास समाज पंचायत संघा तर्फे **हार्दिक शुभेच्छा !**

## विभाग क्र. १० (लालबाग)

# संत रोहिदास भवन उभारणीसाठी सहकार्य करा !

**श्री. संदीप घनदाट**




संत रोहिदास जयंती सोहळयात विभागाच्या वतीने संत रोहिदास भवनास रु. ५५,५५५/— चा धनादेश विभाग अध्यक्ष श्री. शंकर नारकर हे संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम यांना देताना छायाचित्रात डाविकडून श्री. पंढरी जानवलकर, श्री. संदीप घनदाट, श्री. सिताराम आंबेकर, श्री. अशोक देवरूखकर, श्री.भास्कर प्रभुलकर व श्री. रामदास शिर्के दिसत आहेत.

रोहिदास समाज पंचायत संघ ही चर्मकार समाजासाठी राजकीय विरहीत काम करणारी शिखर संस्था आहे. संघाच्या वतीने परळ येथे "संत रोहिदास भवन" बाधण्याचा संकल्प संघाचे अध्यक्ष **श्री. भागुराम कदम** यांनी केलेला आहे. हा संकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी समाज बंधू—भगिनींनी सर्वतोपरी सहकार्य करावे असे आवाहन **श्री. संदीप घनदाट** यांनी केले. ते रोहिदास समाज पंचायत संघ, विभाग समिती क्र. १० ने आयोजित केलेल्या **संत रोहिदास जयंती व महिला हळदी कुंकू समारंभात** प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, माझे वडील चर्मकार समाजात जन्मल्यामुळेच आमदार होऊ शकले. याची जाण आम्हाला आहे. आपणही समाजाचे हे ऋण मान्य केले पाहिजे. व त्यातून उतराई होण्याचा प्रयत्न कारावा. या प्रसंगी त्यांनी स्वतःची संत रोहिदास भवनासाठी रु. ५१,०००/— ची देणगी जाहिर केली.

संघाचे अध्यक्ष **श्री. भागुराम कदम** यांनी विभाग समितीने चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल विभाग पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. संत रोहिदास भवन उभारणी ही चर्मकार समाजाची अस्मिता आहे. ही अस्मिता टिकविण्यासाठी सर्व समाजाने आपली संघ शक्ती दाखवावी असे आवाहन केले.

या प्रसंगी **श्री. सिताराम आंबेकर** (उद्योजक), संघाचे चिटणीस **श्री. पंढरी जानवलकर**, समारंभाचे अध्यक्ष **श्री. शंकर नारकर** यांचे समयोचित भाषणे झाली.

या कार्यक्रमात विभाग समितीचे अध्यक्ष **श्री. शंकर नारकर** यांनी विभाग समितीच्या वतीने रु. ५५,५५५/— देणगीचा धनादेश संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम यांच्याकडे सुपूर्द केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग चिटणीस **श्री. रामदास शिर्के** यांनी केले. तर सुत्रसंचालन **श्री. भास्कर प्रभुलकर** यांनी केले.

## विभाग क्र. १३ (घाटकोपर)

# 'संत रोहिदास व छत्रपती शिवाजी महाराज यांची सयुक्त जयंती साजरी'

विभाग समिती क्र. १३ तर्फे संत रोहिदास व छत्रपती शिवाजी महाराज यांची संयुक्त जयंती दिनांक १६ मार्च २०११ रोजी विक्रोळी पार्कसाईट येथे विभाग अध्यक्ष व संघाचे उपाध्यक्ष **मा. श्री. विजय सावर्डेकर** यांच्या अध्यक्षते खाली साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे संघाचे माजी चिटणीस **मा. श्री. लक्ष्मण खेडेकर** यांनी आपल्या काव्यमय भाषणात संत रोहिदास यांच्या जीवनावर व विचारांवर भाषण करून मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहूणे स्थानिक नगरसेवक मा. श्री. काशिनाथ थारली यांनी समाज संघटणेचे महत्व विषद करून सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले व संत रोहिदास भवनास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. विजय सावर्डेकर यांनी समाजकार्याचा आढावा घेत संत रोहिदास भवन बांधकामाबद्दल संपूर्ण माहीती दिली. तसेच संत रोहिदास भवना पोटी आतापर्यंत देण्यात आलेल्या देणगीतभर करून ती रु. १,२५,०००/— करण्याचा स्वतःचा मानस जाहीर केला. हा कित्ता सर्व समाज बंधू—भगिनी यांनी गिरवावा असे आवाहन केले.

सदरहू कार्यक्रमात इंदिरानगर स्थानिक पंचायतीचे सभासद **श्री. रामदास शिरकर** यांनी रु. ११,०००/— ची देणगी संत रोहिदास भवनसाठी जाहीर केली.

सदरहू कार्यक्रमास बहुसंखेने सभासद बंधू—भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभाग चिटणीस श्री. सुरेश आंबोकर यांनी केले, तर कोषाध्यक्ष श्री. बाळकृष्ण विनेरकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. आभार प्रदर्श उपचिटणीस श्री. प्रकाश कोंडविलकर यांनी केले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विभाग क्र. १४ (विक्रोळी ते मुलुंड)

# ‘संत रोहिदास जयंती सोहळा साजरा’




रोहिदास समाज पंचायत संघ, विभाग समिती क्र. १४ ने आयोजित केलेल्या संत रोहिदास जयंती सोहळयास मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे व संघाचे उपाध्यक्ष श्री. विजय सावर्डेकर, छायाचित्रात डाविकडून विभाग उपचिटणीस श्री. शांताराम देवळेकर, विभाग चिटणीस श्री. सुरेश चव्हाण, प्रमुख पाहुणे व समाज कल्याण समितिचे चिटणीस श्री. केशव पंदीरकर, कार्यक्रमाचे व विभागाचे अध्यक्ष श्री. कृष्णा काजरोळकर, साहित्य समितिचे अध्यक्ष व विभाग विश्वस्त श्री. रामदास आंबोकर, विभागाचे कोषाध्यक्ष श्री. तुकाराम काजरोळकर दिसत आहेत.

रोहिदास समाज पंचायत संघाच्या विभाग समिती क्र. १४ च्या विद्यमाने संत रोहिदास जयंती सोहळा दिनांक १३ मार्च २०११ रोजी विक्रोळी येथे रोहिदास बालवाडी सभागृहात संपन्न झाला. विभाग अध्यक्ष आणि वृतपत्र लेखक **मा. श्री. कृष्णा काजरोळकर** हे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी परळ येथे भव्य आलिशान संत रोहिदास भवन लवकरच उभे राहिल असा विश्वास व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की चमत्कार आणि आख्यायिका भक्ती भावातून निर्माण होतात. संताच्या चारित्र्यातून भक्तीभाव लक्षात घ्यावा असे सांगितले.

सोहळयाची सुरूवात प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे संघाचे उपाध्यक्ष **मा. श्री. विजय सावर्डेकर**, समाज कल्याण समितीचे चिटणीस **मा. श्री. केशव पंदिरकर** हे उपस्थित होते. तसेच विभागाचे विश्वस्त व साहित्य समितीचे अध्यक्ष **मा. श्री. रामदास आंबोकर** यांची समयोचित भाषणे झाली.

श्री. विजय सावर्डेकर यांच्या हस्ते संत रोहिदास भवनसाठी रु. ५०००/– आणि त्यापेक्षा अधिक देणगीदारांचा विभागा तर्फे पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कन्नमवार नगर–२ चे सभासद डॉ. सतीश मासवकर यांनी वडिल कै. प्रभाकर मासवकर यांच्या स्मरणार्थ संत रोहिदास भवनसाठी रु. २५,०००/– चा धनादेश संघाचे उपाध्यक्ष श्री. विजय सावर्डेकर यांजकडे सुर्पुद केला.

या सोहळयाला माजी विश्वस्त श्री. बंडू देवरूखकर, श्री. विनायक पेवेकर, श्री. गणेश चिपळूणकर, श्री. महादेव कदम, श्री. काशिनाथ काजरोळकर आदी प्रतिष्ठित मान्यवर आणि समाज बंधू–भगिनी मोठया संखेने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभाग चिटणीस **मा. श्री. सुरेश चव्हाण** यांनी केले. आभार प्रदर्शन उपचिटणीस **श्री. शांताराम देवळेकर** यांनी केले. सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री. प्रकाश मासवकर, श्री. बाळकृष्ण सावर्डेकर, श्री. तुकाराम काजरोळकर यांनी सहकार्य केले.

## विभाग क्र. १९ (मालाड ते दहिसर)

# ‘एक स्त्युत्य उपक्रम’

— **श्री. भागुराम कदम**



वैद्यकीय शिबीरात संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम हे रक्त तपासणी करून घेत असताना छायाचित्रात, विभाग चिटणीस श्री. सुनिल शिवतरकर, विभागाचे हिशोब तपासणीस श्री. विजय सावर्डेकर, श्री. अनंत पाटणकर व सौ. शिवतरकर दिसत आहेत.

विभाग समिती क्र. १९ ने रविवार दिनांक १३ फेब्रुवारी २०११ रोजी, आकुर्ली म्युनिसिपल शाळा, कांदिवली (पूर्व) येथे समाज बांधव व भगिनींसाठी **‘वैद्यकिय चाचणी शिबिराचे’** आयोजन केले होते.

संघाचे अध्यक्ष मा. **श्री. भागुराम कदम** यांनी दीप प्रज्वलन करून शिबीराचे उद्‌घाटन केले. या प्रसंगी त्यानी विभाग क्र. १९ च्या परंपरेला शोभेसा असा ‘एक स्त्युत्य उपक्रम आहे’ ते पुढे म्हणाले की, **कै. सहदेव शिवतरकर** यांनी या विभागाची सुरूवात करताना शिस्तबध्द कार्यक्रमाचे आयोजन कसे करावे याचे बाळकडू या विभागाला मिळाले याचे उत्तम उदाहरण म्हणजे आज सकाळी ८.१५ वा. हया शिबीराला ३५–४० सभासद व महिला उपस्थित होते.

हया शिबीरामध्ये ब्लड ग्रुप, इ. सी. जी. , मधूमेह, ब्लड शुगर, लिपीड प्रोफाईल (रक्तातील चरबीयुक्त पदार्थांची तपासणी), कोलेस्ट्रॉल, एस ट्रायग्लीसराईड, एल. डी. एल., किडनी फंक्शन टेस्ट–एस. क्रीयाटीनी, बन. या टेस्ट रु. १००/– व हृयदय सोनोग्राफी रु. २००/– अशी नाममात्र शुल्क आकारण्यात आले. या शिबीरात ६५ सदस्यांनी सहभाग घेतला.

या शिबीराचे प्रमुख मार्गदर्शक सन्माननीय डॉ. सखाराम मेढेकर हे होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी **श्री. गणेश चव्हाण, श्री. अरविंद पेवेकर, श्री. विजय सावर्डेकर, श्री. सुनिल शिवतरकर, श्री. दिनेश मेढेकर, श्री. रमेश पाटणकर, श्री. विजय केळकर** व **श्री. प्रकाश विनेरकर** तसेच **सौ. प्रणाली विनेरकर, सौ. संध्या घानकुटकर** यांनी सहकार्य केले.

# संत रोहिदास भवन निधी देणगीदार

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २२०४ | श्री. सिताराम देवजी कदम<br>कै. देवजी दाजी कदम<br>यांच्या स्मरणार्थ | १,१११/– |
| २२०५ | श्री. लक्ष्मण सखाराम पावसकर | १,१११/– |
| २२०६ | श्री. वसंत हिरू सावर्डेकर<br>कै. हिरू बाबू सावर्डेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,१११/– |
| २२०७ | श्री. सुधीर पांडुरंग मुरुडकर<br>सौ. अनुसया बाबुराव कोंडविलकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,१११/– |
| २२०८ | श्री. रविंद्र विठ्ठल कोलबेकर<br>कै. डॉ. दादासाहेब कोलबेकर (पाटील)<br>यांच्या स्मरणार्थ | १,००८/– |
| २२०९ | श्री. गोविंद गणू शृंगारपूरे | १,००१/– |
| २२१० | श्री. मंगेश मनोहर धामापूरकर<br>कै. मनोहर राजाराम धामापूरकर<br>(वडील) यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| २२११ | श्री. कृष्णा विठ्ठल काजरोळकर | १,००१/– |
| २२१२ | श्री. अशोक गोंविद वायंगणकर | १,००१/– |
| २२१३ | श्री. नितिन वासुदेव कदम | १,००१/– |
| २२१४ | श्री. गणेश महादेव चिपळूणकर | १,००१/– |
| २२१५ | श्री. जनार्दन सखाराम सावर्डेकर | १,००१/– |
| २२१६ | श्री. रोहन दिपक धामणकर | १,००१/– |
| २२१७ | श्री. मारूती विठ्ठल देवळेकर | १,००१/– |
| २२१८ | श्री. बाळकृष्ण दाजी चव्हाण<br>कै. दाजी चव्हाण यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| २२१९ | श्री. अनिल गोपाळ केळशीकर<br>कै. गोपाळ नारायण केळशीकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| २२२० | श्री. बाबुराव दा. कोंडविलकर<br>सौ. अनुसया बाबुराव कोंडविलकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| २२२१ | श्री. संतोष पंजाबराव गव्हाळे | १,००१/– |
| २२२२ | श्री. धर्मेंद्र तुकाराम म्हाप्रोळकर<br>कै. तुकाराम गोविंद म्हाप्रोळकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| २२२३ | श्री. यशवंत बाबाजी सावर्डेकर | १,००१/– |
| २२२४ | श्री. बाळाराम धोंडू केळशीकर | १,००१/– |
| २२२५ | श्री. संजय बळवंत चिपळूणकर<br>सौ. स्नेहल बळवंत चिपळूणकर (आई)<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२२६ | श्री. विशाल विश्वनाथ गडकरी<br>कै. विश्वनाथ धाकू गडकरी (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२२७ | सौ. पार्वती शंकर शिरगांवकर | १,०००/– |
| २२२८ | श्री. गणेश धोंडू तुरळकर | १,०००/– |
| २२२९ | श्री. मनोहर महादेव नेवरेकर<br>श्रीमती कमल महादेव नेवरेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२३० | श्री. श्यामसुंदर बळीराम चव्हाण<br>कै. सुभद्रा बळीराम चव्हाण (आई)<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२३१ | श्री. दिनेश शांताराम आंजर्लेकर | १,०००/– |
| २२३२ | श्री. लक्ष्मीकांत हरिश्चंद्र सावर्डेकर | १,०००/– |
| २२३३ | श्री. धरमदास गणपत जानवलेकर | १,०००/– |
| २२३४ | श्री. यशवंत शंकर धयालकर | १,०००/– |
| २२३५ | श्री. महेश वसंत मर्चंडे | १,०००/– |
| २२३६ | श्री. सुभाष पांडुरंग आंबोकर<br>कै. रितेष सुभाष आंबोकर<br>(मुलगा) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२३७ | श्री. शरद कृष्णा खेडेकर | १,०००/– |
| २२३८ | श्री. संकलेश गंगाराम आंबोकर | १,०००/– |
| २२३९ | श्री. मनोहर अर्जुन दासगावकर<br>कै. अर्जुन दासगावकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२४० | श्री. सूर्यकांत भागुराम पंदीरकर | १,०००/– |
| २२४१ | श्री. प्रशांत रामचंद्र आंबोकर<br>कै. रामचंद्र विठ्ठल आंबोकर व<br>कै. सुचिता विठ्ठल आंबोकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |

# संत रोहिदास भवन निधी देणगीदार

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २२४२ | श्री. सुर्यकांत रामचंद्र पेवेकर<br>कै. रामचंद्र गोविंद पेवेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२४३ | श्री. अंकुश बंडू मेढेकर | १,०००/– |
| २२४४ | श्री. शिवदास यशवंत समजिसकर<br>कै. यशवंत शिवा समजिसकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२४५ | श्री. सुरेश गणपत जालगांवकर<br>ग.भा. नर्मदाबाई सोनू जालगांवकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२४६ | श्री. परशुराम गंगाराम वायंगणकर | १,०००/– |
| २२४७ | श्री. विनायक शंकर आंबोकर | १,०००/– |
| २२४८ | श्री. प्रकाश गजानन चिपळूणकर<br>कै. गजानन रामा चिपळूणकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२४९ | श्री. सुभाष लक्ष्मण देवरूखकर<br>कै. लक्ष्मण भाऊ देवरूखकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२५० | श्री. दत्ताराम महादेव निरूळकर | १,०००/– |
| २२५१ | श्री. गजानन न. पालवणकर | १,०००/– |
| २२५२ | श्री. राजेन्द्रकुमार रा. नेवरेकर | १,०००/– |
| २२५३ | श्री. संदिप रमेश घानकुटकर<br>कै. रमेश विठोबा घानकुटकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२५४ | श्री. रविंद्र गुणाजी सावर्डेकर<br>कै. गुणाजी बाबाजी सावर्डेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२५५ | श्री. सुरेश हरी लांजेकर<br>कै. नारायण सुडकोजी लांजेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२५६ | श्री. आत्माराम भिकूराम शिरीसकर<br>सौ. अलका आत्माराम शिरीसकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २२५७ | श्री. दिपक सिताराम चव्हाण<br>कै. सिताराम महादेव चव्हाण<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२५८ | श्री. सुनिल सोनू सावर्डेकर<br>कै. सोनू गणपत सावर्डेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२५९ | श्री. सदानंद गोविंद काजरोळकर | १,०००/– |
| २२६० | श्री. आदेश सिताराम जानवलेकर | १,०००/– |
| २२६१ | श्री. रामचंद्र बाबाजी जाधव<br>कै. गोपीचंद बाबाजी जाधव<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२६२ | श्री. रघूनाथ गणपत पालशेतकर | १,०००/– |
| २२६३ | श्री. सुभाष शंकर धयालकर | १,०००/– |
| २२६४ | श्री. यादवेंद्र विठ्ठल पेवेकर | १,०००/– |
| २२६५ | श्री. दिनेश प्रभाकर मोरे<br>कै. चंदा प्रभाकर मोरे (मातोश्री)<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२६६ | श्री. विलास गणपत खेडेकर | १,०००/– |
| २२६७ | श्री. हरिश्चंद्र रामा मुरुडकर | १,०००/– |
| २२६८ | श्री. अमोल राजेंद्र साबळे<br>कै. राजेंद्रकुमार महादेव साबळे<br>(वडील) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२६९ | श्री. दत्ताराम लक्ष्मण केळकर | १,०००/– |
| २२७० | श्री. शांताराम मोतीराम नारकर<br>कै. मोतीराम गणू नारकर व<br>ग.भा. भागिर्थी मोतीराम नारकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२७१ | श्री. दत्तात्रय रामचंद्र गिमोणकर<br>कै. रामचंद्र सखाराम गिमोणकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| २२७२ | श्री. भिकाजी विठ्ठल कदम | १,०००/– |
| २२७३ | श्री. राकेश रमेश दाभोळकर | १,०००/– |
| २२७४ | श्री. मनोज भिकूराम आंगळेकर | १,०००/– |
| | | (क्रमशः) |

# रामनवमी उत्सव साजरा






संघाचे चिटणीस श्री. पंढरी जानवलकर व पत्नी सौ. कविता पंढरी जानवलकर, श्री प्रभुरामचंद्र यांचा अभिषेक करताना छायाचित्रात दिसत आहेत.

दर वर्षाप्रमाणे याही वर्षी रोहिदास समाज पंचायत संघाच्या समाज कल्याण समितीच्या वतीने ''रामनवमी''चा उत्सव मंगळवार दिनांक १२ एप्रिल २०११ रोजी जगजीवनराम सभागृह, श्रीराम मंदीर, परळ येथे संघाचे अध्यक्ष **श्री. भागुराम कदम** यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

सकाळी ठीक ११.३० वा. **सौ. कविता व श्री. पंढरी जानवलकर,** संघ चिटणीस यांच्या शुभहस्ते श्री प्रभुरामचंद्र यांना अभिषेक करण्यात आला. दुपारी १२.३० वा. रामजन्म झाला. यावेळी पाळण्याची दोर लांब लचक घेऊन सर्व समाज बांधवांना पाळणा हळविण्याची संधी मिळाली.

रामनवमी निमित यावेळी संघाचे माजी उपाध्यक्ष श्री. कृष्णा मेढेकर यांच्या वतीने उपस्थित समाज बंधू–भगिनी, व हितचिंतकांना 'प्रसाद' देण्यात आला.

या उत्सवा निमित्ताने नगरसेवक व बेस्ट समिती अध्यक्ष मा. श्री. सुनिल शिंदे, संघाचे माजी अध्यक्ष व नगरसेवक मा. श्री. रमेश मेढेकर, सिनेअभिनेत्री रंजना यांच्या मातोश्री वत्सला देशमुख, मुंबईचे माजी महापौर मा. श्री. महादेव देवळे यांनी भेट देऊन श्री प्रभुरामचंद्रचे दर्शन घेतले. यावेळी समाजबांधव मोठया संखेने उपस्थित होते.

# वधू-वर व पालक परिचय मेळावा

## समाजाच्या कार्यात युवकानी हिरीरीने भाग घ्यावा ! – श्री. भागुराम कदम

युवकानी फक्त लग्न जमविण्यासाठी समाजाकडे न येता. समाजाच्या अन्य कार्यक्रमात सुध्दा हिरीरीने भाग घ्यावा असे आवाहन संघाध्यक्ष **श्री. भागुराम कदम** यांनी केले. ते संघाच्या वधू–वर व महिला संघटन समितीने रविवार दि. २७ मार्च २०११ रोजी, ललित कला भवन, डिलाईल रोड, येथे आयोजित वधू–वर व पालक परिचय मेळाव्यात अध्यक्ष पदावरून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, पालकानी सुध्दा युवकाना समाजकार्यात वळविण्यासाठी त्यांच्यावर सामाजिक संस्कार करावेत. या प्रसंगी उद्योगपती **श्री. सिताराम आंबेकर** यांनी सुध्दा उपवर वधू–वरांना मार्गदर्शन केले. समारंभाचे प्रास्ताविक समिती अध्यक्ष **श्री. गजानन जानवलकर** यांनी केले. सुत्रसंचालन सरचिटणीस श्री. रवि पेवेकर यांनी केले. आभार प्रदर्शन समिती चिटणीस **श्री. सुभाष कोडविलकर** यांनी केले.



वधू–वर व पालक परिचय मेळाव्याचे उद्घाटन, संत शिरोमणी संत रोहिदास यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रसिध्द उद्योगपती श्री. सिताराम आंबेकर, उद्घाटन करत असताना छायाचित्रात दिसत असून डाविकडून चिटणीस श्री. गणेश चव्हाण, संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम, चिटणीस श्री. पंढरी जानवलकर, सरचिटणीस श्री. रवि पेवेकर, समिती अध्यक्ष श्री. गजानन जानवलकर, समिती चिटणीस श्री. सुभाष कोंडविलकर दिसत आहेत.



वधू–वर यांचे छायांकित अर्ज पाहाताना पालकवर्ग छायाचित्रात दिसत आहेत